# B.A.II Sem – IV Paper No.V

## Gender and Violence

## लिंगभाव आणि हिंसाचार

## Topic 4: Women's Harassment at Workplace

## कार्यस्थळी होणारा स्त्रियांचा छळ

### C. Remedies and Vishakha Guildelines, Act 2013 :

उपाययोजना आणि विशाखा मार्गदर्शक तत्वे,अधिनियम २०१३

# C. Remedies and Vishakha Guildelines, Act 2013 :

## उपाययोजना आणि विशाखा मार्गदर्शक तत्वे

**१. राज्यघटनात्मक उपाययोजना :**

**अ. मुलभूत हक्क :**

कलम १२ ते ३५ मध्ये पुरुषांबरोबर स्त्रियांना देखील समतेचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क,शोषनाविरुद्धचा हक्क,धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क,सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क,घटनात्मक उपाय ......

कलम १४ – कायद्यापुढे सर्व व्यक्ती समान

कलम १५ – धर्म,जात,वंश,लिंग,जन्मस्थळ या आधारावर भेदभाव करणार नाही

कलम २१ – व्यक्तीचे वैयक्तिक व जीवित स्वातंत्र्य हिरावून घेतले जाणार नाही

कलम २३ – मानवाचा दुर्व्यापार व वेठबिगारी प्रथेस बंदी

**ब. मार्गदर्शक तत्वे :**

कलम ३९ – स्त्री-पुरुषांना समान काम समान वेतन

कलम ४२ – राज्याने कामधंद्याच्या बाबतीत न्याय व माणुसकीचे वातावरण निर्माण करावे

समान वेतन अधिनियम – १९७६

प्रसुती लाभ अधिनियम – १९६१

## २. भारतीय दंडसंहितेतील तरतुदी :

कलम ३५४ – स्त्रियांची छेड काढणे हा दखलपात्र गुन्हा ठरवून त्यासाठी २ वर्षे कारावास व दंड

कलम ३७६ – बलात्कार किमान ७ ते १० वर्षे कारावास किंवा जन्मठेप

कलम ५०९ – अश्लील शब्द,हावभाव किंवा कृतीद्वारे स्त्रीच्या शालीनतेचा अपमान केल्यास १ वर्षे कारावास किंवा दंड

## ३. महिला आयोग :

स्त्रियांच्या संरक्षणासाठी केंद्र सरकारने १९९२ मध्ये राष्ट्रीय महिला आयोग व राज्यांनी राज्य महिला आयोग स्थापन केलेले आहेत.

१. स्त्रियांच्या संरक्षणासाठी केलेल्या घटनात्मक व कायदेशीर तरतुदींचा अभ्यास करून त्यांच्यावर देखरेख ठेवणे व त्यांचे पुनरावलोकन करून त्यात दुरुस्त्या करणे.

२. स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा करण्यासंदर्भात संशोधन करणे.

३. स्त्रियांच्या हक्कांवर आक्रमण झाल्यास त्याची चौकशी करणे .

४. स्त्रियांच्या तक्रारी व गाऱ्हाणीसोडविण्यासाठी आलेल्या अर्जाचा विचार करून त्यावर कारवाई करणे.

५. गरजू महिलांना कायदेविषयक व इतर बाबतीत मदत करणे.

६. स्त्रियांचा सन्मान वाढविण्यासाठी जनजागृती करणे .

## ४. विशाखा मार्गदर्शक तत्वे :

**अर्थ :** कामाच्या ठिकाणी स्त्रियांच्या होणाऱ्या लैंगिक छळास प्रतिबंध करण्यासाठी भारतातील सर्वोच्च न्यायालयाने १९९७ मध्ये जी मार्गदर्शक तत्वे घालून दिली त्याला विशाखा मार्गदर्शक तत्वे असे म्हणतात.

**पार्श्वभूमी :**

- राजस्थान मधील महिला विकास कार्यक्रम सेविका – भंवरदेवी
- १९९० मध्ये गुज्जर समुदायातील बालविवाह रोखला
- बलात्कार
- राजस्थान उच्च न्यायालयाने आरोपींची निर्दोष मुक्तता
- या निर्णयाच्या विरोधात 'विशाखा' नावाच्या स्वंयसेवी संस्थेने सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली.
- या खटल्याचा निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने १९९७ मध्ये कार्यस्थळी होणाऱ्या लैंगिक छळास प्रतिबंध करण्याच्या उद्‌देशाने मार्गदर्शक तत्वे घालून दिली.

**मार्गदर्शक तत्वे :**

१. स्त्रियांच्या सुरक्षिततेसाठी पर्याप्त उपाययोजना करणे ही केंद्र सरकार व राज्य सरकार यांची जबाबदारी आहे.

२.कार्यस्थळी स्त्रियांच्या अस्मितेचे संरक्षण होणे हा त्यांचा घटनात्मक अधिकार आहे.

३. कार्यस्थळी होणाऱ्या स्त्रियांच्या लैंगिक छळास प्रतिबंध व्हावा या उद्देशाने नियमांविषयी लोकांत जागृती निर्माण व्हावी म्हणून हे नियम कार्यस्थळी प्रदर्शित व प्रसारित करावेत.

४. स्त्रियांना नोकरीवर ठेवणारी व्यक्ती ही सरकारी असो किंवा खाजगी क्षेत्रातील असो तिच्यावर विशाखा मार्गदर्शक तत्वे लागू करणे बंधनकारक आहे.

५. कार्यस्थळी होणाऱ्या स्त्रियांच्या लैंगिक छळाची चौकशी करण्यासाठी एक तक्रार समिती स्थापन करणे आवश्यक आहे.

६. या तक्रार समितीचे अध्यक्ष पद एखाद्या स्त्रीकडे असावे तसेच या समितीच्या सदस्यांमध्ये किमान निम्मे सदस्य हे स्त्रिया असल्या पाहिजेत.

७. समितीच्या सदस्यांमध्ये काही मतभेद निर्माण झाल्यास ते मिटविण्यासाठी एक तिसरा पक्ष असावा.हा तिसरा पक्ष एखादी बिगरशासकीय संघटना किंवा जबाबदार संघटना,संस्था असू शकेल.

८. ऑक्टोंबर २०१३ मध्ये विशाखा मार्गदर्शक तत्वांचा विस्तार करण्यात आला.त्यानुसार बार कौन्सिल ऑफ इंडिया आणि मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया या संस्थाना कार्यस्थळी होणारा लैंगिक छळ थांबवण्यासाठी समित्या स्थापन कराव्यात असा आदेश दिला आहे.

९. विशाखा मार्गदर्शक तत्वानुसार स्त्रियांच्या लैंगिक छळाची चौकशी करण्यासाठी प्रत्येक कार्यास्थळी अंतर्गत समिती असावी लागते.

## ५. कार्यस्थळी स्त्रियांचा लैंगिक छळ (प्रतिबंध,मनाई व निराकरण ) अधिनियम २ ०१३ :

- सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या विशाखा मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने कार्यस्ठळी होणाऱ्या स्त्रियांच्या लैंगिक छळास प्रतिबंध करण्यासाठी केंद्र शासनाने ९ डिसेंबर २०१३ पासून संपूर्ण भारतभर एक अधिनियम लागू केले ते म्हणजे “कार्यस्थळी स्त्रियांचा लैंगिक छळ (प्रतिबंध,मनाई व निराकरण ) अधिनियम २०१३

## ६. प्रतिबंधात्मक उपाययोजना :

१. कडक अंमलबजावणी :
२. सक्षम महिला आयोग :
३. धैर्याने प्रतिकार :
४. व्यवस्थापनाची जबाबदारी :
५. जागृती :
६. संप्रेषण माध्यम :